**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,**
***Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2017: 5.068, www.srjis.com***
*PEER REVIEWED & REFERRED JOURNAL, JUNE-JULY, 2019, VOL- 7/34*

# बदलत्या जगातील शिक्षण: स्त्री उत्थानाची गरज

## सुकन्या पु. भाटे

*(निवृत्त, प्राचार्य), मुळा एज्युकेशन सोसायटीचे इंग्रजी व मराठी माध्यमाचे डी.एड. कॉलेज, वडगाव गुप्ता,अहमदनगर.* *sukanyabhate@gmail.com*

**Abstract**

*भारतीय कुटुंब व्यवस्था पुरूषप्रधान आहे. नुकत्याच झालेल्या जनगणनेत महाराष्ट्र राज्यात सहा वर्षाच्या खालील मुलींचे प्रमाण ३० अंकांनी कमी आहे. हा प्रश्न फक्त महाराष्ट्र व भारतापुरता मर्यादित नसून जागतिक चिंतेचा विषय आहे. बदलत्या जगातील सर्व बाबींचे ज्ञान स्त्रीला व्हावे म्हणून स्त्रियांनी पेटून उठण्याची गरज आहे. तरच स्त्री भ्रूण हत्या, हुंडाबळी, आत्महत्या, कौटुंबिक अत्याचार या सर्व अनिष्ट गोष्टींमधून स्त्रीची सुटका होईल. डॉ. राणी बंग यांनी म्हटल्याप्रमाणे स्त्री शक्तीमध्ये देशात सुवर्णकाळ आणण्याची ताकद आहे. भारतीय स्त्री शक्ती संघटनेच्या अधिवेशनात समाज उभाणीमध्ये स्त्रियांचा सहभाग कसा अत्यावश्यक आहे, या विषयावर त्या बोलत होत्या. तनिष्का सदस्या नववर्षासाठी अनेक संकल्प घेऊन बाहेर पडलेल्या आहेत. ग्रामदत्तक योजना, उद्योजकता वाढ, आरोग्यावर भर, बेटी वाचवा, पाण्याची जागृती, स्वच्छतागृह, एड्सग्रस्तांचे पुनर्वसन, निर्भयतेचा संकल्प अशा अनेक शिक्षणाची गरज ही संपूर्ण तळागाळातल्या वेगळ्या शिक्षणाची गरज स्त्रियांसाठी निर्माण झालेली आहे. या समस्येवर मात करण्यासाठी समाजसेवी संस्थांचा पुढाकार महत्वाचा ठरेल. स्त्रियांच्या चिंताजनक स्थितीबाबत उपाय शोधले नाहीत तर बदलते जग आपल्याला माफ करणार नाही. या समस्येकडे व्यापक समाजहिताच्या दृष्टीकोनातून पाहण्याची गरज आहे.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना:—**

संयुक्त राष्ट्रसंघाने १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून जाहीर केले. तर २००९ हे वर्ष महिला सबलीकरण म्हणून साजरे करण्यात आले. ८ मार्च हा दिन आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून पाळला जातो. १९७५ पासून ह्या दिवशी स्त्रियांचे हक्क याबरोबरच मुलींना सुखी भवितव्य मिळावे म्हणून हा दिन जागतिक शांतता दिवस पाळला जाऊ लागला. असे असतानाही भारतामध्ये स्त्री पुरूष प्रमाणाचा समतोल ढळलेला आहे असे दिसते.

स्वातंत्र्योत्तर काळात महिलांच्या विकासासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आलेले आहेत. समाजात महिला घटक उपेक्षित असण्याआधी आदिशक्तीचे रूप

म्हणजे स्त्री असे म्हणत असत. भारतीय संस्कृतीत महिलांना लक्ष्मी मानले जात होते. मध्यंतरीच्या काळात स्त्रीचा प्रवास क्षीण झाला आणि समाजाचा महिलांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला. आज बदलत्या जगातील शिक्षणासाठी स्त्रियांच्या उत्थानाची आवश्यकता आहे. म्हणून प्रस्तूत शोधनिबंधात स्त्रियांनी जागे होण्याची गरज आहे. समाज व्यवस्थेच्या निर्मितीकरीता सी शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलण्याची गरज यांचे विवेचन शैक्षणिक व सामाजिक दृष्टीकोनातून करण्यात आले आहे.

**शोध निबंधाचा उद्देशः—**

१. महिलांच्या जाणीवेची संकल्पना स्पट करणे.

२. महिलांच्या शैक्षणिक व सामाजिक क्षमतांचा सहभाग तपासून पाहणे.

३. शासकीय व सामाजिक स्तरावरून स्त्री शिक्षणाचा आढावा घेणे.

**विश्लेषणः—**

महिलांच्या स्व—जाणीव जागृतीबद्दलची पहिली वैचारिक बैठक मांडण्याचे श्रेय फ्रेंच महिला सी. मॉड व बिवर या महिलेस जाते. या महिलेने महिलांच्या उत्थानाबद्दलचे पहिल्यांदा आपले क्रांतीकारक विचार सेकंड क्लास या पुस्तकाच्या रूपाने मांडले. गांधींनी  दांडीयात्रा काढून मिठाचा सत्याग्रह केला. त्यात एवढ्या स्त्रिया सहभागी झाल्या होत्या की, तेवढ्या कोणत्याही अन्य संघर्षात महिलांचा सहभाग दिसत नाही.

१९८७ मध्ये युनोने जागतिक महिला स्तरावरील कार्यशाळेत व्हिनेसा ग्रिफेनने केलेली व्याख्या पुढीलप्रमाणे — स्त्रियांचे सक्षमीकरण म्हणजे त्यांच्या अंगी निर्णय घेण्याची, नियंत्रण करण्याची, संघटीत करण्याची क्षमता होय. स्त्रियांची मतप्रदर्शन करण्याची क्षमता, कृतीशील, घडवून आणणारे लोकसंपर्क व संस्थासंपर्क, आर्थिक व्यवहार इत्यादी करण्याची क्षमता होय.

तसेच स्वतःच्या जीवन शैलीप्रमाणे वागण्याची मुभा, सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक क्षेत्रात तसेच स्वतःच्या जीवनात व कुटुंब व्यवस्थेत पूर्णतः असण्याची क्षमता असणे.


Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

आजच्या बदलत्या जगात ग्लोबलायझेशन या संकल्पनेनुसार संपूर्ण जग हा एक ग्लोबल गोल आहे आणि जागतिक स्तरावर आसुलेबलच्या अध्ययन उपपत्तीतील अध्ययन प्रक्रियेत फक्त शिक्षक व विद्यार्थी हेच घटक असतात, पण महत्व आहे ते ज्ञान पक्के करण्याची, स्वत:जवळ असलेल्या ज्ञानाची सांगड नवीन ज्ञानाशी घालणं यालाच आसुबेलची बोधात्मक संरचना असे म्हणतात.

नवीन ग्रहण केलेले ज्ञान राहून उपयोगी नाही तर त्याची सांगड पूर्व ज्ञानाशी घातली पाहिजे तरच बोधात्मक रचनेचा आकृतीबंध तयार होईल.

बोधात्मक संरचनेचा आत्मा म्हणजे बोध. बोध झाला — विषय समजला की ज्ञानग्रहण होते. उदा. नगर शिर्डी रोडवर डॉ. धामणे, BHMS यांनी सुरू केलेल्या इंद्रधनू प्रकल्प : रस्त्यावर फिरणाऱ्या वेडसर महिलांवर मानसिक, शारीरिक उपचार करतात. बदलत्या जगामधील फक्त भौतिक समृध्दीची आज गरज नाही. समाज बदलण्याचे कार्य हेच खरं शिक्षण.

**बदलत्या जगातील स्त्रियांचे शिक्षण**




**१. स्त्रियांच्या आरोग्य शिक्षणाची गरज:—**

सन १९७१ साली एका कंपनीने महिलांसाठी आरोग्यविषयक एक प्रकल्प घेतल प्रकल्पाचा भाग म्हणून दहा हजार महिलांची गर्भजल परिक्षा करण्यात आली.

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

महिलांना लिंग निवड कळल्यानंतर अनेक महिलांनी गर्भपात कायद्याचा दुरूपयोग केला.

२०११ च्या जनगणनेनुसार भारतात एक हजार पुरूषांमागे ९४० स्त्रिया आहेत. महाराष्ट्रात हे प्रमाण ९२५ आहे. स्त्रिया जन्मालाच येऊ नयेत अशी आमच्या समाजाची मानसिकता बदलल्याशिवाय स्त्रियांचा प्रवास सुखकर होणार नाही.

स्त्री भ्रूण हत्या, स्त्रियांची दडपणू करून त्यांचे शोषण, अत्याचार हे प्रकार सातत्याने होत असतात. विवाह, घटस्फोट, विविध व्यसनाधिनता, रोगग्रस्त एच. आय. व्ही. बाधित अशा स्त्रियांचे प्रमाण मोठे आहे.

उद्योजक व्यावसायिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या स्त्रियाही आहेत मात्र हे प्रमाण अत्यल्प आहे. आजही आदिवासी, ग्रामीण स्त्री शेतात दिवसभर राबते आहे. दारिद्र्य, गरीबी, कुटुंबातील पुरूषसत्ताक मनोवृत्ती स्त्रियांवर लादली गेलेली नियंत्रणे यामुळे स्त्रियांच्या आरोग्यविषयक अनेक समस्या निर्माण होतात. दलित वस्तीमधील सांडपाणी, गटार, पाणीपुरवठा योजना या मुलभूत सुविधामधून मिळणाऱ्या आरोग्य शिक्षणाची गरज आहे.

**२. स्त्रियांचे आर्थिक शिक्षण:—**

बांगलादेशातील चितगाव विद्यापीठातील अर्थशास्त्राचे प्राध्यापक व जगप्रसिध्द ग्रामीण बॅंकचे प्रणेते असलेले श्री. महंमद युनूस यांनी १९७५ साली स्वयंसहाय्य गटाची स्थापना केली. ही एक आव्हात्मक प्रक्रियाच आहे. पण याचे प्राथमिक ध्येय महिलांना आत्मनिर्भय बनविले.

भारताचे माजी राष्ट्रपती मा. अब्दुल कलाम यांनी २०२० साली भारत महासत्ता होण्याचे स्वप्न बघितले होते, त्यात महिलांच्या आर्थिक सक्षमिकरणाला विशेष करून महत्व आहे.

**३. स्त्रियांचे सामाजिक शिक्षण:—**

भारतासारख्या देशात आज ही स्त्रियांना अंधश्रध्दा, रितीरिवाज, दारिद्र्य, गरीबी, अज्ञान, निरक्षरता, समाजात व कुटुंबात दुय्यम दर्जाचे स्थान, हुंड्यासारखी प्रथेविरूध्द लढावे लागते आहे.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

भारताच्या इतिहाात राजाराम मोहनरॉय, महर्षि कर्वे, महात्मा जोतीराव फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, रं. धो. कर्वे, प्रबोधनकार ठाकरे हे स्त्री मुक्तीचे प्रणेते आहेत.

भारतात ११ वर्षे एक महिला म्हणजे श्रीमती इंदिरा गांधी पंतप्रधान होत्या. महाराष्ट्राच्या कन्या प्रतिभाताई पाटील यांनी राष्ट्रपती पद भूषविले. भंडारनायके, चंद्रिका कुमारतुंगे, वलिदा झिया, बेगम हसिना या भारतीय उपखंडातील महिला सर्वोच्च नेते पदावर पोहोचला आहे.

तरीही सर्वच स्त्रियांच्या सामाजिक स्थितीमध्ये फारसा फरक पडलेला नाही हे विदारक सत्य नाकारता येत नाही.

**४. स्त्रियांचे स्वयंपूर्णतेचे शिक्षणः—**

सामाजिक न्याय विभागामार्फत विदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन निर्माणाची योजना प्रभावीपणे राबविण्यात आली आहे. अनुसूचित जाती, विमुक्त भटक्या जमाती, अनुसूचित जमाती, विशेष मागासवर्ग अशांसाठी विकासाच्या व स्वयंपूर्णतेच्या काही भागात संधी उपलब्ध आहेत, पण त्याचा लाभ सर्व स्त्रियांपर्यंत पोहोचत नाही या योजनांची माहिती देण्याचे कार्य आजच्या बदलत्या शिक्षणाद्वारे होणे गरजेचे आहे.

**५. स्त्रियांचे सांस्कृतिक शिक्षणः—**

लॅटीन अमेरिका व कॅनडातील मूळ रहिवाशी असलेल्यांनी त्यांचे स्वतःचे प्रस्ताव केले व सकारात्मक पर्याय सूचविले. खरे पाहता भारतातील कुटुंब व्यवस्था व स्त्रियांना मिळणारा मान सन्मान हा पाश्चात्य जगाच्या कुतूहलाचा विषय होता, पण ते आता जगभराच्या चिंतेचा विषय झालेला आहे.

भारतीय लोकशाही हा एक अपूर्ण प्रयोग आहे काकृकी आपण लोकशाहीकडून जास्त अपेक्षा करतो. याचे सर्व शिक्षण आवश्यक आहे. वंचित, अल्पसंख्याक, आदिवासी—दलित महिला यांसाठी परिणामकारक व सहभागपूर्ण समाज घडविण्याची संस्कृती निःपक्षपातीपणे करण्याची गरज आहे. हे बदलत्या जगातील शिक्षणाद्वारे स्त्रियांसाठी तरच उघडी होतील.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**६. स्त्रियांचे सर्जनशीलतेचे शिक्षण:—**

उपजत क्षमतांचे पोषण करून नवनिर्मितीकडे कल वाढवून सर्जनशिलतेचे शिक्षण देणे ही बदलत्या शिक्षणाची गरज आहे. सर्जनशिलतेच्या दृष्टीकोनातून स्त्रियांचा स्वतंत्र बाणा, कल्पक योजना, आत्मविश्वास, चिंतन/स्मरण/स्वयंप्रेरणा या नविन कल्पनांची, नमुन्याची व संबंधाची निर्मिती करण्याची कृती शिक्षणाद्वारे मिळायला पाहिजे.

भारत सरकारने स्त्रियांवरील अत्याचार दूर करण्यासाठी १९९० साली स्त्री हक्क आयोगाची स्थापना केली. महाराष्ट्र शासनाने १९९३ साली राज्य महिला आयोगाची स्थापना केली. १९९४ साली महिला धोरण तयार करून २००० साली महाराष्ट्र शासनाने शाळेच्या दाखल्यावर आईचेही नाव लावण्याची सक्ती केली आहे.

महिलांच्या शिक्षणासाठी व सक्षमीकरणासाठी जागा आरक्षित आहेत. शासनाने वेळोवेळी महिलांसाठी विकास योजना जाहिर केल्या, सर्वांगिण विकास होण्यासाठी शासन प्रयत्नशिल आहे.

पण या चेंजींग वर्ल्डमध्ये फक्त शासन सरकार पुरेशे पडणार नाही. म्हणूनच एनजीओंचे कार्य बदलत्या शिक्षण पध्दतीसाठी कार्य करते आहे.

कोणत्याही चांगल्या कामाचा प्रारंभ स्वत:पासून करावा, असे म्हणतात. म्हणून या चेंजींग वर्ल्डमध्ये मी सामाजिक संस्थांच्या कार्याचा अभ्यास करते आहे.

NGO in Education Programme For Addressing Women in Distress: Case Study of Snhehalaya, Ahmednagar हा माझ्या अभ्यासाचा विषय आहे.

स्नेहालय परिवार सुमारे अडीच दशकांपासून उपेक्षित शोषित महिला बालके यांच्या पुनर्वसनासाठी झटते आहे. अनाम प्रेम संस्था अंध, अपंग, मुकबधीर, कुमारी माता, मुलींच्या व स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी स्नेहालय कार्य करते आहे, त्यात स्त्री भ्रूण हत्या, महिलांवरील कौटुंबिक अत्याचार, जातीयता, अपंग सक्षमीकरण, बालकांवरील अत्याचार, मुलगी वाचवा अशा अनेक प्रकल्पांचा समावेश स्नेहालयाच्या कार्यात आहे.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

स्नेहालयाच्या कार्याची गरज देशातल्या १८ राज्यात गेले आहे. म्हणून स्नेहालय संस्थेतील पीडित महिलांच्या शिक्षण प्रक्रियेत अध्यापन करण्याचा हा प्रयत्न आहे.

अनेक सेवाभावी व स्वयंसेवी संस्थांनी या कार्याची धूरा सांभाळलेली आहे. बदलणाऱ्या जगातील आव्हानांसाठी हे स्त्री उत्थान महिलांच्या आर्थिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक अशा क्षेत्रापूरते मर्यादित न ठेवता स्त्रियांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील आहे. वुमन ऑफ प्युअर वंडरमध्ये रेणुकाची यशोगाथा स्नेहाधाराच्या कार्याची देशपातळीवर दखल देशातील ६० कर्तृत्वान महिलांमध्ये नगरच्या रेणुका दहातोंडे स्नेहालयामुळेच जीवन सार्थकी.

स्नेहालय व स्नेहाधाराच्या सहकार्यामुळे आपल्या जीवनाला अर्थ प्राप्त झाला आहे. आपण स्वत: दुर्धर आजाराने ग्रस्त जरी असले तरी अजून खूप काही करायचं, स्नेहालयातील लहान मुलांसाठीच आपले जीवन समर्पित असल्याची प्रतिक्रीया रेणुका दहातोंडे यांनी पुण्यनगरीशी बोलताना दिली. आपण विमानाने कधी प्रवास करू शकू हे स्वप्नातही पाहिले नव्हते. ते स्वप्न आता प्रत्यक्षात उतरत आहे.

खडतर आयुष्य जगून जीवनात यशस्वी मार्गक्रमण करणाऱ्या देशभरातील ६० महिलांमध्ये स्नेहाधार प्रकल्पातील रेणुकाला मिळालेले स्नान ही स्नेहालयाने आजपर्यंत महिलांसाठी केलेल्या भरीव योगदानाची पोचपावती आहे. आज दिल्लीत अभिनेत्री काजोल देवगण व वोडाफोनचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत रेणुकाचा होत असलेला सन्मान हा स्नेहाधच्या कार्याचा देशपातळीवरील गौरव आहे. वुमेन ऑफ वंडरमध्ये समाविष्ट असलेली रेणुकाची यशोगाथा अनेक शोषित व वंचित महिलांसाठी प्रेरणादायी ठरेल.

निष्कर्ष—

१. ग्रामीण भागातील बहुतांश महिला अद्याप निरक्षर आहेत.
२. महिलांना विकास प्रक्रियेत सहभागी करून घेतल्याशिवाय कोणत्याही देशाचा विकास स्तर उंचावणे शक्य नाही.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

३. आदिवासी, ग्रामीण भागातील दारिद्र्य, निरक्षरता, अज्ञान, दैववाद या समस्या दूर होणारे शिक्षण निर्माण व्हावे.

४. स्त्रियांच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात स्वयंरोजगार निर्माण व्हावेत.

**संदर्भसूची—**

*खरात आ. पा. १९८८ प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र, पुणे, श्रीविद्या प्रकाशन*

*जगताप ह. ना. १९८२ अध्ययन उपपत्ती व अध्यापन, पुणे, नूतन प्रकाशन*

*प्रा. एम. यू. मुलानी, महिला स्वयंसहाय्यता बचत गट, पुणे, डायमंड प्रकाशन*

*लोकराज्य मासिक, अंक ९ वा, डिसेंबर, २०१३*

*योजना मासिक, अंक १ ला, ऑगस्ट, २०१३*

*योजना मासिक, अंक ५ वा, डिसेंबर, २०१३*

*दैनिक पुण्यनगरी: अहमदनगर आवृत्ती — किरण काळे यांचा लेख: वुमून ऑफ प्युअर वंडर, दि. ४ डिसेंबर, २०१३*

*सकाळ अहमदनगर आवृत्ती दि. ३० डिसेंबर २०१३*

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*